डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंध संस्थान, पुणे
**Dr. Vitthalrao Vikhe Patil Institute of Co-operative Management, Pune**
An Institution of National Council for Co-operative Training, New Delhi
(An Autonomous Society promoted by Ministry of Cooperation, Government of India)

संदर्भ :एच.डी.सी.एम.49/VSB/2024-2025/ 141 दिनांक: ०३/०६/२०२४

मा. अध्यक्ष / कार्यकारी संचालक,

1. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे
2. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, गोवा
3. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे
4. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका
5. नागरी सहकारी बँका
6. नागरी सहकारी पतसंस्था
7. कृषी उत्पन्न बाजार समिती
8. सहकारी खरेदी विक्री संघ
9. सहकारी साखर कारखाने
10. सहकारी दुग्ध प्रक्रिया संघ/संस्था
11. सहकारी ग्राहक भांडार
12. जिल्हा सहकारी बोर्ड
13. सहकार प्रशिक्षण केंद्र
14. गोवा राज्य सहकारी संघ, गोवा

विषय :- **४९ वा सहकारी उच्चतम व्यवस्थापन पदविका पाठ्यक्रम पत्राचार** (49th H.D.C.M. Course Correspondence) **दिनांक १८/०६/२०२४ ते २१/०२/२०२५ नामांकन पाठविण्याबाबत**......Reg.

माननीय महोदय,

आपणांस कळविण्यांत येत आहे की, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंध संस्थान, पुणे ही महाराष्ट्रातील सहकारी संस्थांना शिक्षण-प्रशिक्षण देण्यात अग्रगण्य संस्थामध्ये गणली जाते व सहकारी संस्थांचे कर्मचारी व अधिकारी वर्गाला गेली पन्नास वर्षे प्रशिक्षणाव्दारे त्यांच्यामध्ये कार्यकुशलता वाढविण्यासाठी व व्यवसाय क्षेत्रात वेळोवेळी होणारे बदल आत्मसात करण्यासाठी प्रशिक्षणासाठीची शिखर संस्था म्हणून मोलाचे योगदान देत आहे. आमच्या संस्थानच्या वतीने **एन सी सी टी, नवी दिल्ली द्वारा मान्यताप्राप्त व सुधारित सहकारी उच्चतम व्यवस्थापन पदविका पाठ्यक्रम पत्राचार (H.D.C.M Course- 49th)** दिनांक **१८/०६/२०२४ ते २१/०२/२०२५** या कालावधीत आयोजित करण्यांत

.......२/-

**Address :** 43/16-A, Erandwana, Bank of India & Indian Overseas Bank Lane, Opp. Hotel Shangrila, Nal Stop, Karve Road, Pune - 411 004 (Maharashtra)
**GSTIN :** 27AAEAN3477B3ZM **दूरभाष / Phone :** 020-25433816, 25425285
**ई- मेल / e-mail :** info@icmpune.org **वेबसाइट / Website : www.icmpune.org**

येत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा महाराष्ट्रातील अनेक प्रशिक्षणार्थींनी लाभ घेतला आहे. कार्य बाहुल्यामुळे व वेळेच्या अभावी इच्छुक व्यक्तींना व्यावसायिक शिक्षण घेता येत नाही त्यामुळे ही अडचण दूर करण्यासाठी एच.डी.सी.एम. अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. सदरील कार्यक्रमाचा कालावधी ३६ आठवडे (जवळपास ९ महिने) इतका असून दोन सत्रांमध्ये पूर्ण केला जाईल. प्रशिक्षण कार्यक्रम सहकारी संस्थामध्ये वाढत्या व्यावसायिक व्यवस्थापनाच्या गरजा लक्षात ठेवून व दैनंदिन कामकाजाचे स्वरूप विचारात घेऊन तयार करण्यात आलेला आहे. तरी या प्रशिक्षण कार्यक्रमात भाग घेऊन आपल्या संस्थेच्या कर्मचा-यांना आपली शैक्षणिक पात्रता नक्की वाढविता येईल. सदरील कार्यक्रमामध्ये खालील विषयांचा समावेश केलेला आहे.

## <u>पहिले सत्र</u>

अ. क्र. विषयाचे नाव

१. एन्व्हायरमेंट फॉर को-ऑपरेटिव्ह इन इंडिया
(Environment for Cooperative in India)

२. को-ऑपरेटिव्ह लेजिस्लेशन
(Cooperative Legislation)

३. को-ऑपरेटिव्ह क्रेडिट अँड बँकिंग
(Cooperative Credit and Banking)

४. नॉन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह
(Non-Credit Cooperatives)

५. अकाउंट्स अँड ऑडिट
(Accounts and Audit)

६. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी फॉर मॅनेजमेंट- I
(Information Technology for Management - I)

## <u>दुसरे सत्र</u>

अ. क्र. विषयाचे नाव

७. कॉस्ट अकाउंटिंग अँड फायनान्शियल मॅनेजमेंट
(Cost Accounting & Financial Management)

८. मार्केटिंग मॅनेजमेंट
(Marketing Management)

९. अलाईड लॉ
(Allied Laws)

......३/-

१०. ऑर्गनायझेशनल बिहेवियर अँड कम्युनिकेशन
(Organizational Behaviour and Communication)

११. ह्यूमन रिसोर्स मॅनेजमेंट अँड इंडस्ट्रियल रिलेशन्स
(Human Resources Management and Industrial Relations)

१२. प्रोजेक्ट मॅनेजमेंट अँड बिझनेस डेव्हलपमेंट प्लान फॉर को-ऑपरेटिव्ह
(Project Management & Business Development Plan for Cooperatives)

१३. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी फॉर मॅनेजमेंट - II
(Information Technology for Management - II)

१४. डाटा कलेक्शन अँड प्रोजेक्ट रिपोर्ट
(Data collection and Project Report)

तसेच दोन्ही सत्रांसाठी संपर्क वर्गाचे आयोजन केले जाते व त्यांचा कालावधी प्रत्येक सत्रासाठी ३ आठवडे इतका असेल. संपर्क वर्गाची उपस्थिती अनिवार्य असेल. प्रशिक्षणार्थीचा संपर्क वर्गासाठी जाण्या-येण्याचा व जेवणाचा खर्च त्या त्या संस्थेला / प्रशिक्षणार्थींना स्वतःला वहन करावा लागेल. प्रशिक्षणार्थीची संपर्क वर्ग व परीक्षाच्या वेळी राहण्याची सोय संस्थेच्या वसतीगृहामध्ये विनाशुल्क केली जाईल. इतर प्रकारचे भत्ते व प्रवास खर्च प्रशिक्षणार्थींना आपल्या संस्थेमार्फत /स्वतः वहन करावे लागतील. प्रशिक्षणार्थींना वेळोवेळी प्रत्येक सत्राच्या संपर्क वर्गाची, परीक्षेची व इतर बाबींची माहिती अगोदर कळविली जाईल. तसेच प्रशिक्षणार्थींना प्रवेशाबाबत, विषयांच्या माहिती बाबत, व इतर कुठल्याही शंका निवारण्यासाठी श्रीमती. अर्चना एस. वामन, कार्यक्रम सहायक (मो.नं. ९९६०८४९०६४) व श्री. वैभव एस. बोडके, कार्यक्रम संयोजक (मो.नं. ७७६८०८२३१९) यांच्याशी संपर्क साधता येईल.

सदरील पदविका पाठ्यक्रमासाठी प्रशिक्षण शुल्क प्रति प्रशिक्षणार्थी रूपये २०,०००/- + १८% GST= रु.२३,६००/- (रुपये वीस हजार व १८% GST = तेवीस हजार सहाशे फक्त) इतके असेल. ज्यामध्ये पृष्ठाधार साहित्य, इतर प्रशासकीय खर्च, राहण्याची व्यवस्था (संस्थानच्या वसतिगृहामध्ये केवळ संपर्क वर्ग व परीक्षेच्या वेळी) यांचा समावेश असेल. संपर्क वर्ग व परीक्षेच्या वेळी जेवणाची व्यवस्था संस्थानद्वारा केली जात नाही याची प्रशिक्षणार्थींनी कृपया नोंद घ्यावी.

तरी कृपया आपल्या संस्थेतील तीन ते चार अधिकारी / कर्मचा-यांचे नामांकन अर्ज दिनांक १४ जून, २०२४ पर्यंत संस्थानकडे पाठवावे. **ज्या प्रशिक्षणार्थींना थेट प्रवेश घ्यावयाचा असेल त्यांनी त्यांच्या कार्यालयाकडून / वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून रीतसर परवानगी घेऊन नामांकन अर्ज पाठवावा. प्रशिक्षण शुल्क रूपये २०,०००/- + १८% GST असे एकूण रु.२३,६००/- (रुपये तेवीस हजार सहाशे फक्त)** एन.ई.एफ.टी. (NEFT) किंवा UPI द्वारे पाठविण्यासाठी संस्थेच्या खात्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे. एन.ई.एफ.टी. केल्यानंतर प्रशिक्षणार्थींनी संस्थानला नांव व युटीआर नंबर मेलद्वारे **info@icmpune.org** ह्या पत्यावर कळविण्याचे करावे. नामांकन अर्जासोबत प्रशिक्षणार्थीने पासपोर्ट आकाराचे दोन फोटो आणि पदवी प्रमाणपत्राची व आधार कार्ड ची स्वयंसाक्षांकित प्रत जोडावी.

......४/-

| | | |
|---|---|---|
| 1 | Name of the Account Holder | Dr. Vitthalrao Vikhe Patil Institute of Coop Management |
| 2 | Bank Account Number | 7746035956 Savings Account |
| 3 | Name of the Bank | INDIAN BANK |
| 4 | Name of the Branch | DECCAN GYMKHANA |
| 5 | IFSC Code | IDIB000D007 |
| 6 | GST No. | 27AAEAN3477B3ZM |
| 7 | PAN | AAEAN3477B |

कळावे,

आपला विश्वासू

(वैभव एस. बोडके)
कार्यक्रम संयोजक

सोबत: १) परिशिष्ठ (नियमावली)
२) नामांकन अर्ज

## डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंध संस्थान, पुणे - 411 004.

## परिशिष्ठ (नियमावली)

### <u>सहकारी उच्चतम पदविका पाठयक्रम (पत्राचार) या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नियम व अटी</u>

**अ. प्रवेशाबाबत**

१. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना संस्थेने लागु केलेले नियम व अटी सक्तीचे राहतील.

२. प्रशिक्षणार्थींचे वय ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. प्रशिक्षणार्थी पदवीधर असावा.

४. नोकरी करणाऱ्या व खाजगी इच्छुक प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात येईल व प्रवेश संख्या मर्यादित असेल.

५. संपूर्ण प्रशिक्षण शुल्क (NEFT) किंवा UPI द्वारे एकाच वेळीस स्विकारले जातील. हप्त्याने (Installment) प्रशिक्षण शुल्क स्विकारले जाणार नाहीत व एकदा जमा झालेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

६. प्रवेश प्रथम येणाऱ्यास आधी व ज्यांनी आधी संपर्क केला असेल त्यांना प्राधान्याने देण्यात येईल.

**ब. शैक्षणिक वर्षाचे प्रवेश रद्द होणे बाबत (खालील बाबींची पूर्तता न झाल्यास उमेदवाराचा प्रवेश रद्द केला जाईल).**

1. कोणत्याही एका विषयाची परीक्षा न दिल्यास
2. कोणत्याही एका विषयाचे असाईन्मेंट न दिल्यास
3. प्रकल्प अहवाल न दिल्यास
4. सत्रांत तोंडी परीक्षा न दिल्यास
5. संपर्क वर्गास हजर न राहिल्यास
6. गैर वर्तन केल्यास.

7 परीक्षेमध्ये कॉपी केल्यास किंवा गैर मार्गाचा अवलंब केल्यास.

**क) प्रशिक्षण शुल्क बाबत**

वरील बाबीपैकी कोणत्याही बाबींची पूर्तता न झाल्यास प्रवेश रद्द केला जाईल व प्रशिक्षण शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही. त्यानंतर उमेदवार नवीन शैक्षणिक सत्रासाठी नव्याने अर्ज करू शकेल व संपूर्ण प्रशिक्षण शुल्क भरावे लागेल.

**ड) उपस्थितीबाबत**

संस्थान कडून संपर्क वर्गाचे (दुपारी ३.०० ते ५.००, सोमवार ते शुक्रवार) आयोजन केले जाईल. संस्थानमध्ये संपर्क वर्ग व सत्रांत परीक्षेस उपस्थित राहते वेळी प्रशिक्षणार्थींनी संस्थानने दिलेले ओळखपत्र आणणे अनिवार्य आहे. वरील अटी व नियम यांचा उच्चतम पदविका पाठ्यक्रम च्या परीपत्रकामध्ये / प्रवेश पत्रात समावेश करण्यात आलेला आहे.

**ई) पाठ्यक्रमाबाबत**

राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार पाठ्यक्रमाबाबत वेळोवेळी होणारे बदल, सुधारणा, नियम, अटी, ई. प्रशिक्षणार्थींना बंधनकारक असतील.

कार्यक्रम संयोजक

Identity Card size two photos to be sent along with application

## डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंध संस्थान, पुणे - 411004

### नामांकन अर्ज

१. प्रशिक्षण कार्यक्रमाचे नांव : ४९ वा सहकारी उच्चतम व्यवस्थापन पदविका पाठ्यक्रम पत्राचार (49th H.D.C.M. Course Correspondence)

२. कालावधी : **१८/०६/२०२४ ते २१/०२/२०२५**

३. प्रशिक्षणार्थीचे नांव (मराठी) : ..............................................................

प्रशिक्षणार्थीचे नांव (इंग्रजी) : ..............................................................

४. प्रशिक्षणार्थीचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आय डी : ..............................................................

५. हुद्दा : ..............................................................

६. प्रशिक्षणार्थीचा आधार कार्ड नंबर : ..............................................................

७. जन्म तारीख : ..............................................................

८. शैक्षणिक पात्रता : ..............................................................

९. प्रायोजक संस्थेचे नाव व पत्ता, फोन व फॅक्स नं. सहित : ..............................................................
..............................................................

१०. घरचा पत्ता (फोन व मोबाईल नं. सहित) : ..............................................................
..............................................................

११. सध्याचा पदाचा अनुभव : ..............................................................

१२. अनुसुचितजाती/जमाती/एन.टी/ ओबीसी : ..............................................................

१३. बँक यु. टी. आर. नं. .......................... रूपये......................... दिनांक...................

**मी सहकारी उच्चतम पदविका पाठयक्रम (पत्राचार) या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी असलेले सर्व नियम, अटी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.**

प्रशिक्षणार्थीची सही

अधिकाऱ्याची सही व शिक्का